**डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि**
**फर्ग्युसन महाविद्यालय शतकोत्तर रौप्य महोत्सव सांगता समारंभ**

**पुणे, 19 एप्रिल, 2010**

डेक्कन एज्युकेशन सोसायटी व फर्ग्युसन कॉलेजच्या शतकोत्तर रौप्य महोत्सव सांगता समारंभास उपस्थित राहताना मला विशेष आनंद होत आहे. सर्वप्रथम संस्था व्यवस्थापन, विविध विद्याशाखेतील प्राध्यापकवृंद, सर्व विद्यार्थी त्याचप्रमाणे माजी विद्यार्थ्यांना माझ्या हार्दिक शुभेच्छा!

विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर आणि महादेव बल्लाळ नामजोशी यांसारख्या महान व्यक्तींनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना आधुनिक उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी त्यांनी हे क्रांतीकारी पाऊल उचलले.

हीच ती प्रख्यात संस्था जिने परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ घडवून आणून सुजाण नागरिक निर्माण करुन देशात नवजागृती आणण्याच्या उदात्त हेतूने फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. ह्या कॉलेजचा उगम पुण्यात 1880 साली न्यू इंग्लिश स्कूलच्या स्थापनेमध्ये आहे असे म्हणता येईल. त्या काळात विद्यार्थ्यांनी त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण केले की महाविद्यालयीन शिक्षणाचा मोठा यक्ष प्रश्न त्यांच्यापुढे उभा राही कारण तेव्हा कॉलेजेस् फार थोडी होती. त्यामुळेच या शाळेच्या जनकांना उच्च शिक्षणाच्या संस्थेची अतिशय निकड जाणवली, म्हणून 1885 मध्ये खाजगी शिक्षणसंस्थेतर्फे चालवले जाणारे भारतातील प्रारंभीचे हे महाविद्यालय स्थापन केले गेले. गत सव्वाशे वर्षांच्या कार्यांद्वारे या महाविद्यालयाने केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात एक मानाचे स्थान प्राप्त केलेले आहे. मला अभिमानाने सांगावेसे वाटते की माझे वडील नानासाहेब नारायणराव पाटील आणि चुलते श्रीपतराव पाटील हे फर्ग्युसनचेच विद्यार्थी होते.

फर्ग्युसन महाविद्यालय ही केवळ एक उच्च शिक्षण देणारी संस्थाच नाही तर ती अनेक आदर्शांचे प्रतिक आहे. राष्ट्रीय शिक्षण, जे स्वावलंबनाच्या तत्वावर आधारलेले असेल आणि सर्वसामान्यांना परवडेल असे शिक्षण देण्याच्या उदात्त हेतूने या महाविद्यालयाची स्थापना झाली. म. गांधीजींचे राजकीय गुरु आणि महान देशभक्त गोपाळ कृष्ण गोखले यांनी सप्टेंबर 1902 च्या फर्ग्युसन कॉलेजमधील त्यांच्या सत्काराला उत्तर देताना म्हटले होते—''या संस्थेचे सर्वात महत्त्वाचे नैतिक अधिष्ठान असे आहे की ही संस्था एका तत्त्वाचे प्रतिनिधीत्व करते व त्या आदर्शाला मूर्त रूप देते. हे तत्त्व असे की आजचे भारतीय नागरिक परस्परांशी संबद्ध होऊन, एका सर्वधर्मीय समान हेतूसाठी उत्साहाने आणि उमेदीने काम करतील.''

सुमारे एकशे आठ वर्षांपूर्वी जेव्हा त्यांनी हे शब्द उच्चारले तेव्हाची परिस्थिती वेगळी होती परंतु त्यांच्या सांगण्याचा उद्देश आजही लागू आहे. त्यावेळी देशाच्या स्वातंत्र्यासाठी एकत्र येणे आणि त्यासाठी त्याग करणे आवश्यक होते. आता स्वातंत्र्योत्तर काळात देशाला मजबूत करणे, देशाला एकत्र ठेवणे आणि म्हणून जातीय सलोखा व परस्पर सहयोगाच्या भावनेने एकत्र काम करण्याची गरज आहे आणि अफाट मनुष्यबळ क्षमता असणाऱ्या भारताचे सामर्थ्य कृतीत आणण्याच्या ध्येयामध्ये आपणास झोकून देण्याची गरज आहे. जेव्हा जेव्हा मी विद्यार्थी आणि तरुणांशी बोलते तेव्हा त्यांच्यावर माझी मोठी भिस्त असते. आपल्या देशाच्या लोकसंख्येत असलेले तरुणांचे मोठे प्रमाण पाहता हा प्राचीन संस्कृतीचा वारसा लाभलेला युवा देश आहे. हेच तरुण जगातील एक वेगाने वाढणारी आणि सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेपैकी एक अर्थव्यवस्था होण्यासाठी आपल्या देशाला प्रगतीपथावर नेत आहेत. आताच्या विविध उपलब्ध संधींचा आमच्या काळात आम्ही विद्यार्थी असताना विचारही केलेला नव्हता. विज्ञान आणि तंत्रज्ञानातील प्रगतीने ज्ञानाची वेगवेगळी क्षेत्रे आणि उद्योगांची नवनवीन दालने सर्वांसाठी खुली केली आहेत. तरुणांनी या संधींचा लाभ घेण्यासाठी विविध कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत.

ज्ञान आणि शिक्षणाने माणसाच्या व्यक्तिमत्वाला अनेक पैलू पाडले जातात अशिक्षिताला दोन डोळयाने जे दिसते त्यापेक्षा त्याला जास्त दिसते आणि कळायला

मदत होते. उपजीविकेचे चांगले साधन तर ते मिळवून देईलच तसेच जीवनात यश मिळविण्यासाठी उपयुक्त ठरेल. पण हाती घेतलेल्या कामामध्ये आपण सर्वस्व ओतले पाहिजे. सर्वसाधारण कामगिरी आणि अल्प यशाने संतुष्ट होऊ नका. उच्च ध्येय गाठण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा, त्यामुळे भारताची आणि भारतीयांची प्रतिमा उंचावेल. स्वातंत्र्य प्राप्तिनंतर अनेक शाळा व कॉलेजेस्‌च नाहीतर शेकडो विद्यापीठेदेखिल देशात स्थापन झालित. सुशिक्षितांचा मोठा वर्ग निर्माण झाला पण देशातील प्रश्न गरीबीचा असो, लोकसंख्यावाढीचा असो, बेरोजगारीचा असो, रोगराईचा असो किंवा अगदी भ्रष्टाचाराचा असो. हे सोडविण्यासाठी या सुशिक्षित पिढीची किती मदत होईल याचा विचार करण्याची गरज आहे. काहीही झालं की आपण सरकारला दोष देऊन मोकळं होतो. जिथे सरकार दोषी असेल तिथे तो जरूर द्यावा पण हे सर्वप्रश्न सोडविण्याची फक्त सरकारचीच जवाबदारी आहे का ? आपणही काही खारीचा वाटा उचलला पाहिजे व या प्रश्नांचा मुकाबला समाजाचे जबाबदार घटक म्हणून सगळयांनी एकत्र येउन कसा करता येईल याचा विचार करायला हवा. जीवनाच्या प्रत्येक पावलागणिक, तुमचे ज्ञान समाजाच्या कल्याणासाठी आणि शांततामय, समृद्ध आणि प्रगतीशील राष्ट्राच्या निर्माणासाठी कसे उपयोगी पडेल याचा विचार करायला हवा. डेक्कन एज्युकेशन सोसायटीची निर्मिती याच आदर्शांवर झाली आहे. भारतीय समाजाच्या, थोर परंपरा विशेषत: विविधतेतून एकता तसेच समता, बंधुत्वाची आणि सामंजस्याची भावना यांसारखी मूल्ये सशक्त कशी करता येतील याचा नेहमी विचार केला पाहिजे. समाजातील वंचित लोकांची सेवा कशी करता येईल ? पर्यावरणाचे संरक्षण कसे करता येईल ? अशा विविध ध्येयपूर्तीसाठी तुमचे योगदान एका सर्वसमावेशक व समतापूर्ण समाजाच्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरेल.

सद्यस्थितीत भारत आपल्या इतिहासाच्या एका वैशिष्टयपूर्ण कालखंडातून जात आहे ज्यामध्ये आपण अनेक स्थित्यंतरे अनुभवतो आहे. सध्याच्या ज्ञानाधारित आणि तंत्रज्ञानावर चाललेल्या युगामध्ये महाविद्यालयांची भूमिका खूप महत्त्वाची झाली आहे आणि म्हणूनच देशाच्या सुशिक्षित आणि कौशल्याने सज्ज मनुष्यबळाची गरज भागविण्यासाठी त्यांनी चांगले कार्य केले पाहिजे.

फर्ग्युसन महाविद्यालय आणि त्याच्याशी संलग्न महाविद्यालयांनी विविध क्षेत्रांमध्ये आपल्या व्यासंगाने तळपणारे अनेक विद्वान निर्माण केले. मला हे ऐकून अतिशय आनंद झाला की काळाची गरज ओळखून, महाविद्यालयाने तांत्रिक शिक्षण, व्यवस्थापन, व्यावसायिक प्रशिक्षण आणि कृषी संशोधनासारख्या अनेक विद्याशाखांचा दर्जा वाढविला आहे. या वर्षीच्या फेब्रुवारीमध्ये पुण्यातील काही विद्यार्थी दहशतवादी स्फोटाचे बळी ठरले ज्यात आपल्या महाविद्यालयातील एका विद्यार्थिनीचाही समावेश होता. या स्फोटामध्ये अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आणि अनेकांना कायमचे अपंगत्व आले. ही दु:खाची गोष्ट आहे. ज्यांनी आपले प्राण गमावले त्यांना केवळ स्वत:साठी नव्हे तर आपल्या आईवडीलांसाठी अनेक स्वप्ने पूर्ण करायची होती. अशा दहशतवादी घटना आणि निरपराध व्यक्तींवर केलेल्या हिंसाचाराच्या घटना आपल्या संस्कृतीच्या गुणविशेषांवर केलेला हल्ला होय. आपल्या राष्ट्राला शांतता आणि सहिष्णुतेच्या तत्त्वांचा अभिमान आहे. आपण सर्व मानव जातीकडे एक मोठे कुटुंब म्हणून बघतो. निष्पाप स्त्री-पुरुषांची हत्या करणारे दहशतवादी मानवतेचे शत्रू आहेत. त्यांचा पाडाव केला पाहिजे. भारत दहशतवादाचा सामना करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाबरोबर काम करीत आहे. परंतु आपण या दहशतवादयांमुळे आपल्या विकासाच्या आणि प्रगतीच्या मार्गापासून नाउमेद होता कामा नये. मला विश्वास आहे की फर्ग्युसन कॉलेज युवकांना आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करण्यासाठी सक्षम बनवेल.

फर्ग्युसन कॉलेजच्या सर्व प्राध्यापकवृंदास माझ्या शुभेच्छा. त्यांच्या कार्याला विविध पैलू आहेत. ते ज्ञानाला मोठा अन्वयार्थ देतात, अभ्यासाची वातावरण निर्मिती करतात ज्याद्वारे विद्यार्थ्यांना काळजीपूर्वक आणि चिकित्सकपणे विचार करण्यासाठी उत्तजेन दिले जाते. नीतीमत्ता आणि मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. त्यामुळे त्यांच्या जीवनात त्यांना फार मोठं बळ मिळेल. भारतीय संस्कृतीकडे जगभर मोठ्या कौतुकाने पाहिले जाते. आपल्या संस्कृतीला जगात वैशिष्ठ्यपूर्ण स्थान आहे व त्यामुळे भारताचा सन्मान वाढतो आहे.

शेवटी, मी डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आणि फर्ग्युसन महाविद्यालयाचे या महत्वाच्या समारंभादिवशी अभिनंदन करते. गेल्या सव्वाशे वर्षांची आपली महान परंपरा कायम राखण्यासाठी आपण सतत प्रयत्नरत रहाल याची मला खात्री आहे. येथे उपस्थित सर्वांना माझ्या हार्दिक शुभेच्छा.

धन्यवाद.

जय हिन्द.